


॥ राष्ट्रदेवाः भवेम ॥

# ज्ञान प्रबोधिनी
# शैक्षणिक साधन केंद्र

## ई-प्रशिक्षक

वर्ष १ : अंक १० / ऑगस्ट २०१४






निबंधलेखनात सुधारणा कशा कराव्यात



समाजदर्शन उपक्रम




Book Review

www.erc-pune.org

# संपादकीय

सस्नेह नमस्कार

विदयार्थी शाळेमध्ये काही मूलभूत कौशल्ये शिकतो. श्रवण, वाचन, गणन, लेखन ही त्यापैकी काही कौशल्ये. अलिकडच्याकाळात बहुपर्यायी प्रश्न असणाऱ्या स्पर्धा-परीक्षांच्या जमान्यात लेखन कौशल्याचा संकोच होतो आहे का अशी शंका येते आहे. आपले विचार प्रभावीपणे लिहून मांडण्यासाठी काही तंत्रे शिकावी लागतात. प्रश्नांची उत्तरे लिहिणे, परिच्छेद लेखन, पत्र लेखन, निबंध लेखन ही लेखनाची पारंपरिक उदाहरणे, परंतु बदलत्या काळात सर्जनशील लेखनाला संधी मिळण्यासाठी विविध प्रकारचे लेखन उपलब्ध आहे. जाहिरातीचा मजकूर, इंटरनेटवरील ब्लॉग, फेसबुक-व्हॉट्सअपवरील प्रतिक्रिया यामध्ये थोडक्यात पण आकर्षक असे प्रतिभाशाली लेखन करता येते. थोडक्यात कागद पेन असो अथवा संगणकावरील टंकन असो अथवा स्मार्टफोन-टॅब्लेटवरील अक्षरांचा स्पर्श असो लेखनाला पर्याय नाही. परंतु मजकूर लिहिला जाण्यापूर्वी तो मनात तयार व्हावा लागतो. लेखनातील गोंधळ म्हणजे विचारातील गोंधळ असे म्हटले जाते. लेखन कौशल्ये विकसित होत असताना विचार कौशल्यांकडेही लक्ष दयावे लागेल. वैचारिक शिस्त लागण्यासाठी माहितीवर प्रक्रिया करण्याची कौशल्ये शिकावी लागतील. हवी ती माहिती योग्य वेळी आठवण्यासाठी स्मरण कौशल्ये विकसित करावी लागतील. कौशल्य विकसनाची एक मोठी साखळी आहे. या साखळीतल्या दोन टोकांची उदाहरणे म्हणून या अंकातील दोन लेखांकडे पाहता येईल. विद्यार्थ्यांनी समाजदर्शन घेता-घेता शहरातल्या स्वच्छतेविषयीच्या अडचणी जाणून घेतल्या. सफाई कामगारांशी संवाद केला. त्यांचे आरोग्य, शिक्षण, कौटुंबिक परिस्थिती जाणून घेतली. नागरिकांचे कचरा आणि स्वच्छतेविषयीचे दृष्टिकोन जाणून घेतले. त्यांचे बरे-वाईट वर्तनही पाहिले. आत्मपरीक्षा करुन स्वतःच्या स्वच्छतेविषयीच्या सवयींचाही आढावा घेतला. हे करत असताना केवळ बौद्धिक विचार न करता संवेदनशील मनाने हे सारे अनुभव टिपले. असे दर्शन घडले तर मनात विचार आणि भावना निर्माण होतात. मनात उमटलले दुसऱ्याला सांगावेसे वाटते. हे सांगणे कधी तोंडी कधी लेखी तर कधी चिन्हांच्याद्वारे होते. ही असते अनुभवांची अभिव्यक्ती. ही अभिव्यक्ती सशक्त व्हावी म्हणून कोणती तंत्रे वापरायची त्याचे विवेचन निबंध लेखनावरच्या लेखात केले आहे.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना विविध अनुभव दयायचे असतात आणि त्या अनुभवांनी मनात निर्माण झालेले विचार आणि भावना प्रभावीपणे मांडायलाही शिकवायचे असते. पुढील अंकांमधून असे आणखीही काही लेखन प्रसिद्ध होईल. आपण जरूर प्रतिसाद द्यावा.

प्रा. विवेक पोंक्षे

# निबंधलेखनात सुधारणा कशा कराव्यात

शीर्षक वाचून तुमच्या हे ध्यानात आलं का, की या लेखाचं शीर्षक नेहमीसारखं 'निबंधलेखन कसे करावे' हे दिलेलं नाही. असं वेगळं शीर्षक देण्यात अर्थातच माझा काही हेतू आहे. निबंधलेखन कसे करावे अशा शीर्षकाचे लेख आतापर्यंत अनेकांनी लिहिले आहेत. वेगवेगळ्या गाईड्स–मार्गदर्शिकांमधून–दहावीविषयक अंकांमधून तुम्ही ते वाचलेही असतील. निबंधाच्या बहुतेक सर्व अंगांचा समग्र विचार त्यातून तुमच्यापुढे मांडलेला असतो. आदर्श निबंध यामध्ये काय काय हवे याची जंत्रीही त्यात दिलेली असते. इतकंच काय बोर्डात पहिल्या आलेल्या विनया हातवळणेचे अक्षरशिल्प सारखे निबंधसंग्रहही प्रसिद्ध झाले आहेत. त्यात आदर्श, उत्कृष्ट, सुंदर निबंध वाचायला मिळतात. असे असूनही अनेक विद्यार्थ्यांना निबंधलेखन म्हणजे मोठे संकट वाटते. एखादा उंच डोंगर चढताना दमछाक व्हावी तशी त्यांची स्थिती होते आणि त्यांना वाटतं, नको रे बाबा या वाटेनं जायला! आदर्श म्हणजे काय हे समजले तरी त्या आदर्शाप्रत पोहोचायचं कसं याची वाट त्यांना सापडत नाही. ती वाट धुंडाळण्याचा एक प्रयत्न या लेखात केला आहे.

तुम्ही जर आठवीत, नववीत असाल तर जरा आपल्या निबंधाच्या वहीची पाने उलगडून प्रत्येक निबंधाला आपल्या शिक्षकांनी किती गुण दिले ते पाहा. काय दिसले तुम्हांला? पहिल्या निबंधाला जर १० पैकी ४ गुण दिले असतील तर दहाव्या निबंधालाही ४ च गुण फार फार तर ५ गुण दिलेले आढळतील. म्हणजे आपली जर ४ गुण मिळविण्याची लायकी असेल तर वर्षाअखेरीसही आपली तीच लायकी राहिली आहे. त्यात काही बदल, सुधारणा झालेली दिसत नाही. आपले गुण वाढतील कसे याचा विचार आपण करीत नाही. अर्थात एवढा परीक्षार्थी दृष्टिकोनही पुरेसा नाही. त्याच्या पलिकडे जाऊन आपला निबंध सुंदर कसा होईल, परिपूर्ण कसा होईल असा उत्तमतेचा, परिपूर्णतेचा ध्यास आमच्या विद्यार्थ्यांना लागला पाहिजे व त्या दृष्टीने निबंधाचा दर्जा सुधारण्यासाठी प्रयत्न करायला हवा.

कोणत्याही प्रकारच्या निबंधाचे दोन भाग पडतात. एक भाग म्हणजे त्या निबंधाचे मुद्दे किंवा त्याचा आशय आणि दुसरा भाग म्हणजे त्या त्या आशयाची अथवा मुद्द्यांची मांडणी म्हणजेच निबंधाची शैली. निबंधाचा आशय आणि शैली या दोन्ही दृष्टींनी जो निबंध उंची गाठू शकतो तो उत्तम ठरतो. नुसतेच मुद्दे चांगले आहेत, पण शैलीचा काही पत्ताच नाही; असा निबंध उकडलेल्या भाज्या अन् बिनफोडणीच्या दुधी भोपळ्याच्या भाजीसारखा सकस पण बेचव, रुचिहीन होईल. तर सुंदर शैलीमधील पण मुद्दे गहाळ झालेला निबंध हॉटेलातील तळलेल्या भज्यांसारखा खमंग, रुचकर पण नि:सत्व, पोषणमूल्य नसलेला असा वाटेल. मग निबंध कसा हवा? तर आईने जीव ओतून, प्रेमाने बनविलेल्या भरल्यावांग्याच्या भाजीसारखा, मस्त चमचमीत मसालेभातासारखा किंवा, (या जागी तुमच्या आवडीचे पदार्थ डोळ्यांपुढे आणा पण तोंडाला पाणी सुटू देऊ नका!)

सर्वसाधारण पहिलीपासून दहावीपर्यंत शिक्षक वर्गामध्ये जेव्हा निबंधाची तयारी करून घेतात तेव्हा निबंधाचे मुद्दे कोणकोणते असतील ते वर्गात सांगतात. किंवा मुले चर्चेमध्ये निबंधाचे मुद्दे सांगू शकतात. जसे पावसावर निबंध लिहायचा झाला तर खालीलप्रमाणे मुद्दे व उपमुद्दे यांचा आराखडा तयार करता येईल.

१) उन्हाळ्यातील वातावरण – उकाडा, तापलेली जमीन, तहानलेली झाडे, प्राणी, सूर्याचे दाहक, आग ओकणारे दर्शन, इत्यादी.

२) पहिल्या पावसाचे आगमन – आकाशात जमलेले ढग, त्यांच्या हुलकावण्या, पावसाची आतुरतेने वाट पाहणारा शेतकरी, सुसाट सुटलेले वारे, मधेच चमकणाऱ्या विजा, पहिल्या पावसाने मातीला येणारा सुगंध, पहिल्या पावसात भिजण्याची मजा, हवेत आलेला गारवा, इत्यादी.

३) सृष्टीत झालेले बदल – वृक्ष, वेली–रोपांना फुटलेली पालवी, जाई, जुई, कुंदाला येऊ लागलेल्या कळ्या, हिरवीगार कुरणे – (सृष्टीने पांघरलेला शेला), ऊन–पावसाचा खेळ, इंद्रधनुष्य, ढगांमधून होणारा मनोहर सूर्यास्त, इत्यादी.

४) प्राण्यांमधील बदल – पावसात आंघोळी करणाऱ्या चिमण्या, डराँव डराँव करून उड्या मारणारे बेडूक, पिसारा फुलवून नाचणारे मोर, झाडांवर आश्रय घेणारे कावळे, छपराखाली दडून बसलेली कबुतरे, फुलांवरून उड्या मारणारी फुलपाखरे ,इत्यादी.

५) शहरातील बदल – मुलांची, मोठ्यांची पावसामुळे उडालेली तारांबळ, रेनकोट, छत्र्या यांची खरेदी, नद्यांना आलेले पूर, झोपडपट्ट्यांत शिरलेले पाणी, तुंबलेल्या पाण्यामुळे वाहतुकीत निर्माण झालेले अडथळे, सर्दी– खोकल्यांचा प्रादुर्भाव, इत्यादी.

येथे सर्व मुद्दे दिलेले नाहीत पण यांप्रमाणे मुद्दे, उपमुद्दे, त्यातील तपशील नोंदविता येतील. एका निबंधात सर्वच मुद्यांची खिचडी केली पाहिजे असे नाही. आपल्या निबंधात कोणते मुद्दे येणार हे त्या मुलाला आतापर्यंत मिळालेले अनुभव, त्याचे भोवतालच्या सृष्टीचे सूक्ष्म निरीक्षण, त्याचे इतर पुस्तकांचे सखोल वाचन अशा अनेक घटकांवर अवलंबून आहे. खेड्यातल्या मुलाला पावसाची जी अनुभूती येईल ती शहरातल्या मुलाला येणे अवघड आहे. विहिरी भरल्या, शेतातली पिकं डोलू लागली किंवा काळ्या मातीचा गंध हा त्याच्या निबंधातून डोकावेल तर शहरातील मुलाला रेनकोट, छत्र्यांची खरेदी, शाळेला मिळालेली सुट्टी यांची चटकन आठवण होईल. आपण कधी गारा पडलेल्या पाहिल्याच नसतील अन वेचून खाल्ल्याच नसतील, जर त्याची मजा चाखलीच नसेल तर निबंधात त्या मुद्यांचा उल्लेख येईलच कसा? पिसारा उलगडून नाचणारा मोर फारच थोड्या मुलांनी पाहिला असेल! त्याचं ते बेभान धुंद होऊन नाचणं आपण अनुभवलं तर ते शब्दांमधून मांडता येईल. यासाठी आपलं अनुभवविश्व हे व्यापक, समृद्ध होण्याची आवश्यकता आहे. आडातच नसेल तर पोहऱ्यात कोठून येणार हे भान येणे आवश्यक आहे.

तीच गोष्ट सूक्ष्म निरीक्षणाची. निरीक्षण करताना आपल्या पंचज्ञानेद्रियांचा उपयोग जागरूकपणे करायला हवा. डोळे, नाक, कान, जीभ व त्वचा यांनी भोवतालच्या सृष्टीतील संवेदना टिपल्या पाहिजेत. डोळ्यांना पाऊस कसा दिसतो. कानांना त्याचे वेगवेगळ्या वेळी वेगवेगळे ध्वनी कसे एकू येतात. (टपटप, रिमझिम, धो धो, सो सो इ.) पावसाच्या पाण्याने मातीच्या अत्तराचा घमघमाट आपले घ्राणेंद्रिय – नाक कसे हुंगते, पावसाच्या पाण्याची, गारांची चव जीभ कशी चाखते आणि पावसात भिजून अवघे अंग ओले चिंब होऊन अंगावर शिरशिरी कशी येते, रोमांच कसे उभे राहतात, बराच वेळ पावसात भिजल्यावर सुरुवातीला वाजणारी थंडी पळून जाऊन उबदार कसे वाटते, हे सारे पंचज्ञानेंद्रियांना अनुभवायचे आहे. या अनुभवांचे निरीक्षण, नोंदी यातून निबंधाचे मुद्दे डोळ्यांपुढे येणार आहेत.

पाठ्यपुस्तकाखेरीज इतर काही वाचायला हवे आहे याचे भान नव्या पिढीने हरवले आहे असे मला वाटते. अन्य वाचन म्हणजे कॉमिक्स, उथळ चटपटीत कथा, जोक्स इ. वाचणे एवढाच अर्थ त्यांना समजतो. शिक्षकांनी, ग्रंथपालांनी, पालकांनी अन्य दर्जेदार पुस्तकांचा परिचय मुलांना करून द्यायला हवा. खांडेकर, फडके, काणेकर यांचे लघुनिबंध, पु. ल. देशपांडे यांनी व्यक्ती आणि वल्ली, बटाट्याची चाळ, अपूर्वाई, यातील विनोदाच्या आश्रयाने रंगविलेली व्यक्तिचित्रे, प्रवासवर्णने, सावरकारांचे माझी जन्मठेप, सहा सोनेरी पाने, गांधी, विनोबा यांच्या सारख्यांची चरित्रे, वैचारिक वाड्मय, काय वाचावे याची नोंद करायची म्हटले तर हे आख्खे मासिक भरून जाईल. प्रश्न असा आहे की आमचा ८ वी, ९ वी तील विद्यार्थी हे वाचतो आहे का? त्याला वाचनाची तहान लागलीय का टी.व्ही.च्या भुलभुलैय्यात तो हरवून गेला आहे? विविध प्रकारच्या वाचनातून आपल्याला विचारांचा,कल्पनांचा खजिना हाती लागता.आपल्याला हवे असणारे मुद्दे, आशय तर त्यामुळे सापडतोच पण अनेक प्रकारच्या शैली, मांडणी, शब्दयोजना यांचा परिचय होतो. आपला शब्दसंग्रह अमाप वाढतो. त्यातून आपली स्वत:ची शैली तयार होत असते. निबंध लिहिताना आवश्यक असे सुंदर शब्द धो धो कोसळणाऱ्या पावसाच्या सरींसारखे एकामागून एक बरसू लागतात. कागदावर सहजपणे उमटू लागतात. यासाठी ज्याला निबंध लेखनाची तपश्चर्या करायची आहे त्याने वर्षाला १०० – २०० पुस्तके वाचण्याखेरीज अन्य पर्याय नाही!

निबंधाचे मुद्दे, उपमुद्दे यांचा आराखडा तयार करणे अतिशय आवश्यक आहे. जसजसे मुद्दे सुचत, आठवत जातील तसतशी त्यात भर घातली पाहिजे. अशा रीतीने मुद्द्यांची आघाडी भक्कम तयार केली पाहिजे. त्यानंतर त्यातील निबंधाला उपयुक्त असे निवडक मुद्दे घेऊन त्यांचा क्रम डोळ्यांपुढे आणावा. एकातून एक मुद्दे उलगडत जातील अशारीतीने त्यांची संगती लावावी. निबंध वाचताना त्यातील सलगता जाणवायला हवी. जेवताना भातात खडा लागावा तसे हा मुद्दा मध्येच इथे कुठे उपटला असे वाचताना वाटता कामा नये!

निबंधाचा दुसरा भाग म्हणजे निबंधाची मांडणी, शैली. ही आत्मसात करण्यासाठी साधनेची गरज आहे. निबंधाच्या विषयानुसार त्यातील विचार, कल्पना अथवा भावना आपल्याला समर्पक चपखल शब्दांमध्ये व्यक्त करता येणे आवश्यक आहे. या शैलीसंबंधी कोणकोणत्या मुद्द्यांचा विचार करायला हवा? पहिली म्हणजे उचित अशी शब्दरचना व वाक्यरचना! यासाठी विशेषणे, क्रियाविशेषणे, वाक्प्रचार, म्हणी यांचे भांडार भरलेले हवे. यासाठी उपाय म्हणजे आठवीपासून एक संग्रहवही तयार करायची! त्यामध्ये म्हणींचा संग्रह करा; वाक्प्रचारांचा संग्रह करा; सुभाषिते, सुवचने, सुविचार यांचा संग्रह करा.ज्ञान प्रबोधिनीद्वारे प्रसारीत होणाऱ्या छात्र प्रबोधनच्या प्रत्येक अंकात सुविचार आणि कवितेच्या ओळी असतात. त्यांचा संग्रह तुम्हाला उपयुक्त होईल. याच्या पलिकडे जाऊन सुप्रसिद्ध कवींच्या सुप्रसिद्ध, उपयुक्त कवितांचा संग्रह करणे अतिशय आवश्यक आहे. या कवितांमधून नादमधुर, काव्यमय असे सुंदर शब्द आपल्याला हाती लागतील. ते निबंधामधून पेरता येतील. निळे आकाश काळ्या ढगांनी भरून गेले आहे, असे म्हणण्याऐवजी निळेशार आभाळ काळ्याभोर ढगांनी क्षणार्धात व्यापून टाकले या तऱ्हेची वाक्यरचना अधिक सुंदर वाटते. त्याचप्रमाणे गडद निळ्या आभाळाचा घुमट काळ्याकुट्ट ढगांनी काळवंडून गेला –

**‘नभ मेघांनी आक्रमिले’**

**‘गडद निळे जलद भरून आले.’**

**‘शीतलतनु चपलचरण अनिलगण निघाले’**

अशा ओळींचा उल्लेख स्वाभाविकपणेच आपल्याला मोहून टाकतो. पावसावर निबंध लिहायचा तर पावसावरच्या पाचपन्नास कविता तर मला सहज आठवताहेत.

**‘ श्रावणमासी, हर्षमानसी,’**

(बालकवी)

**आला आषाढ, श्रावण, आल्या पावसाच्या सरी ।**

**किती चातकचोचीने प्यावा वर्षाऋतु तरी,**

(बा. सी. मर्ढेकर)

**येरे घना येरे घना न्हाऊ घाल माझ्या मना ।**

(आरती प्रभू)

**पहिल्या हिरव्या तृणपात्याचा आज असे सत्कार**

(मंगेश पाडगावकर)

**पश्चिम क्षितिजाच्या भाळावर रुळे कुरळे बट डौलदार**

**सावळया ढगांची**

(विं. दा. करंदीकर)

**‘ पेरते व्हा..........’**

(अनिल)

**रक्तरवीचे लावून कुंकुम, संध्या ल्याली निळसर अंबर।**

**संध्या आली झुलवीत झुलवीत, इंद्रधनूचा पदर मनोहर**

**‘टपटपटप काय बाहेर वाजतेय ते पाहू**

**चल ग आई चल ग आई पावसात जाऊ’**

**‘अवचित आला पाऊस, घेऊन सुट्टीची नोटीस**

**अल्जिब्र्यातून जसे पडावे, मोराचे पीस’**

(पेडणेकर)

.... किती उदाहरणं देऊ तुम्हाला? वहीत अशा कविता नुसत्या जमवून भागणार नाही तर त्यातील महत्त्वाच्या ओळी मुखोद्‍गत हव्यात तरच परीक्षेमध्ये ऐन वेळी निबंध लिहिताना त्यांचा उचित वापर करता येईल; त्यासाठी येता जाता आपली संग्रहवही आपल्या हाताशी हवी व वेळ मिळेल तेव्हा ती पुन्हा:पुन्हा चाळायला हवी. शिक्षकांनी वर्गामध्ये सूचना फलकावर अशा कविता लावून ठेवल्या तर मुलांना त्या संग्रहवहीत नोंदविता येतील. वर्गात प्रकट काव्यवाचन करणे, चालीवर कविता म्हणणे यामुळेही कवितांचे पाठांतर होण्यास मदत होईल.

निबंधाच्या प्रकारानुसार निबंधाची शैली बदलते. वैचारिक निबंधात सुसंगत तर्कशुद्ध विचार मांडणे महत्त्वाचे. विचार पटवून देण्यासाठी तज्ज्ञ व्यक्तींच्या सुवचनांचे दाखले महत्त्वाचे ठरतात.

**कल्पनाप्रधान निबंध** – उदा. ऋतुवर्णन, प्रवासवर्णन, जर तर चे निबंध यात तुम्हाला किती नावीन्यपूर्ण वेगळ्या– कल्पना स्फुरतात ते महत्त्वाचे त्यात उपमा, उत्प्रेक्षा, रूपक अशा अलंकारांनी नटलेल्या वाक्यांची पेरणी, कवितांच्या ओळींची अवतरणे शोभा वाढवितात. या प्रकारात तुमच्या प्रतिभेची झलक दाखवायला जास्त संधी मिळते.

**भावनाप्रधान निबंध** – उदा. व्यक्तिचित्रांचे रेखाटन – जीवनातील अविस्मरणीय प्रसंगांचे रेखाटन. यासाठी अलंकारिक शैली बोजड वाटते. तिथे प्रासादिक, सहज साधी वाक्येच मनाला भिडतात. तुम्ही प्रसंग किती भावनोत्कटतेने रंगवू शकता हेच तिथे महत्त्वाचे ठरते! याउलट लघुनिबंधामध्ये हलकीफुलकी प्रसन्न खेळकरशैली शोभून दिसते. यासाठी विविध प्रकारचे साहित्य वाचनात आले तर शैलींची ओळख होईल. कोणत्या शैलीला कोणती वाक्यरचना शोभून दिसेल ते समजून येईल.

निबंधातून कोणत्या रसाचा आविष्कार करायचा तेही आधी ठरवून ठेवायला हवे. एका पावसावरील निबंधातून विविध रसाविष्कार शक्य आहेत. धो धो पावसामुळे झोपडपट्टीत उडालेला हाहाकार वर्णन करून तुम्हाला रौद्र किंवा करुणरसाचा आविष्कार करता येईल. तर पावसात घसरून पडल्याने अंगाला जो चिखल लागला त्या प्रसंगाचे वर्णन करून हास्यरसाचा आविष्कार करता येईल. पावसावरचा निबंध संपूर्णत: विनोदी शैलीत लिहिता येईल.

निबंधाच्या मांडणीशी संबंधित एक महत्त्वाचा भाग म्हणजे निबंधाची सुरुवात व निबंधाचा शेवट कसा करायचा ते ठरविणे. हे दोन्ही वाचकावर किंवा परीक्षकावर खूप प्रभाव टाकत असतात.त्यासाठी स्वत:चा एक संकल्प हवा की माझा निबंध इतरांपेक्षा, नेहमीपेक्षा काही तरी वेगळा झाला पाहिजे. जे सगळ्यांना सुचतं तेच मीही लिहिलं तर मला जास्त गुण पडण्याची शक्यता कमी आहे. विशेषत: ज्यांना १० पैकी ६–७ गुण पडतात त्यांनी यासाठी अधिक प्रयत्न करायला हवा. एकाच निबंधासाठी निदान ४–५ तरी प्रकाराने सुरुवात करून पाहावी. सुरुवात प्रसंगाने, अवतरणाने, गोष्टीच्या उदाहरणाच्या दाखल्याने, कवितेच्या ओळीने अशी विविध प्रकारे करून पाहावी. त्यातील जी आकर्षक, उचित वाटेल ती– निवडावी. जे सुरुवातीबद्दल म्हटले तेच शेवटासंबंधी म्हणता येईल. शेवटी देखील वेगवेगळया ४–५ पद्धतींनी करून पाहावा व नंतर निवड करावी.

निबंध जर वेगळा व्हायला हवा असेल तर त्याची सुरुवात, शेवट व मांडणी यांच्यामध्ये अनपेक्षित, आश्चर्यकारक असे स्वरूप कसे आणता येईल याचा विचार करावा. उदाहरणार्थ माझा अविस्मरणीय प्रवास असा निबंधाचा विषय असला की मुले लोणावळा, महाबळेश्वरसारख्या एखाद्या प्रेक्षणीय स्थळाच्या सहलीविषयी लिहितात; पण माझ्या जीवनाची गाडी प्रवासाला निघाली––– जन्मले ते पहिले स्थानक होते. मग प्रत्येक स्थानकावर प्रवासाच्या वेगवेगळ्या टप्प्यात कोण कोण व्यक्ती जीवनात आल्या. त्यांचे अनुभव सांगणे असाही वेगळा निबंध लिहिता येईल. यासाठी आपल्याला जाणीव असणं महत्त्वाचं आहे की मला काही वेगळा निबंध लिहायचाय!

सर्वांत शेवटी महत्त्वाचं म्हणजे निबंध निदान ३ ते ४ वेळा पुन्हापुन्हा लिहिला पाहिजे. प्रत्येक वेळी लिहिण्यापूर्वी आधीच्या लेखनातील चुका टाळत व सुधारणा करत लिहीत गेले पाहिजे. पहिल्यांदा लिहितो तेव्हा साधारण मुद्द्यांची मांडणी झालेली असते; पण शैलीविषयक पूर्ण विचार झालेला नसतो. दुसऱ्यांदा लिहिताना, सुरुवात, शेवट मुद्द्यांचा क्रम यात आवश्यक ते बदल करून पुन: लिहा. तिसऱ्यांदा लिहिताना प्रत्येक परिच्छेदात कोठे कोठे अवतरणे, कवितांच्या ओळी घालता येतील याचा विचार करून लिहा. अवतरणे व कवितांच्या ओळींचा एकाच निबंधात पाऊस पाडू नका. त्यांचा अतिरेकही निबंधाची गुणवत्ता कमी करतो. चौथ्यांदा निबंध लिहिण्यापूर्वी निबंधातील प्रत्येक शब्द व वाक्यरचना नजरेखालून घाला. एक शब्दसुद्धा इकडचा तिकडे करायची गरज नाही. अशी देखणी, नेटकी वाक्यरचना जमली आहे का ते तपासा. निबंधात आवश्यक तिथे शब्दांचे, वाक्यांचे बदल करा व मग सगळा निबंध पुन: लिहा. आपले अक्षर सुंदर आले आहे ना? परिच्छेदाला समास सोडून, अंतर सोडून लिहिले आहे ना? आपले लेखन शुद्ध आहे ना? हे तर बघायला हवेच, ती अत्यावश्यक अशीच आणि कोणत्याही प्रकारच्या लेखनासाठी अपरिहार्य अशीच बाब आहे. या आघाडीवर आपण कच्चे असून चालणारच नाही.

तुम्ही शिक्षकांनी सांगितले तसे निबंध लिहीत जाता; पण एकदा लिहिलेल्या निबंधात वर सांगितलेल्या दृष्टिकोनातून सुधारणा करीत नाही. त्यामुळेच आहे तेथेच राहाता. या लेखातून जी वाट मी दाखविली आहे ती चोखाळून पाहा. कदाचित शिखरापर्यंत पोहोचणे तुम्हाला शक्य होईल आणि निबंधलेखानाचा हा प्रवासही कटकटीचा, दमछाक करणारा न होता, प्रसन्न व आनंदाचा होईल.

अर्थात हे साध्य करायला प्रारंभी कष्ट घ्यावे लागतील. विविध सुट्ट्यांमध्ये स्वत:हून वेगवेगळ्या विषयांवर निबंध लिहिण्याचा सराव करायला हवा. मग लागा कामाला.

शुभस्य शीघ्रम्!

(ज्ञान प्रबोधिनीच्यावतीने प्रसिद्ध होणाऱ्या छात्र प्रबोधन मासिकाच्या वर्ष २ अंक ५ (नोव्हेंबर ९३) मध्ये डॉ. नलिनी गुजराथी यांनी हा लेख लिहिला होता तो येथे पुनर्मुद्रित केला आहे.)




**Everyone is a winner!**

**www.competeprabodhiniway.com**

**An initiative by Jnana Prabodhini and Techlead Software Engineering Pvt Ltd**

**Online Mock Tests Series**

**Package for Homi Bhabha and NTSE**

**CPW** aims to provide you model question papers for Homi Bhabha and NTSE examination through this online mock test series. This provides a practical approach to check your preparation. Mock tests included in this package are as per the latest suggested pattern. Our expert faculty has taken immense efforts to provide you the best mock tests series.

- **Homi Bhabha for Class 6 and 9 contain:** Mock Papers - 3 and subject wise practice tests of 20 marks each. - 8.
- **NTSE (State Level) contain:** Subject wise, Unit wise tests and 50+ guidance videos. Mock Test papers - 5

**FEEDBACK for IMPROVEMENT**

**Ready made Performance Analysis**
Topic wise, Time wise, Round wise, Risk wise and Difficulty level wise !

**Availability & Registration:**

- Mock examination package will be activated as soon as you make payment. Username & Password will be sent to your registered e –mail address. Package will remain active till the date of examination.
- You will also receive valuable suggestions from experts via emails

**Compete Prabodhini Way**

**Jnana Prabodhini Educational Resource Center**
'Vinayak Bhavan', 514 Sadashiv Peth, Pune, Maharashtra, India, 411030.
Phone : 020-24207193/94 Mobile : 8888811664
Email : info@competeprabodhiniway.com
Connect Us: www.facebook.com/CompetePrabodhiniWay

समाजातील विविध सामाजिक घटकांची, समाजात घडणाऱ्या घटनांची, सामाजिक सद्यस्थितीची जाणीव व्हावी, समाजातील विविध प्रश्नांची / समस्यांची ओळख व्हावी, लोकजीवनाची माहिती व्हावी आणि एखादा प्रबोधनात्मक विचार समाजातील विविध घटकांपर्यंत पोहोचवावा व त्या अनुषंगाने विविध सामाजिक घटकांना जाणून घ्यावे या हेतूने ज्ञान प्रबोधिनी बाल विकास मंदिर प्रशालेमध्ये मागील १५ वर्षांपेक्षा जास्त वर्षे समाजदर्शन उपक्रम घेतला जातो.

विद्यार्थी शाळेच्या चार भिंती बाहेर, विविध सामाजिक घटकांपर्यंत जाऊन सामाजिक सद्यस्थिती जाणून घेतात, विविध प्रश्न किंवा समस्यांचा विचार करतात आणि हे करीत असताना एखादा विचार समाजातील विशिष्ट घटकांपर्यंत पोहोचवितात, असं या उपक्रमाचे स्वरुप आहे.

मागील काही वर्षांत शहरातील किंवा जिल्ह्यातील १०१ गावांतील १०१ शाळांमध्ये हा उपक्रम पोहोचविण्याबरोबरच स्त्री-शक्ती जाणीव जागृती कार्यक्रमातून बचत गटांविषयी माहिती घेणे, तेथील महिलांचे काम जाणून घेणे अथवा विविध शाळांत जाऊन मातृभूमी- पूजन करणे किंवा कामगारांविषयी माहिती घेणे असे अनेक कार्यक्रम यानिमित्ताने योजले गेले आहेत.

प्रत्येक वर्षी असा एखादा विशिष्ट विषय किंवा एखादे वैशिष्ट्य निवडून कार्यक्रमाचा सूत्र विषय निश्चित केला जातो. २०१३-१४या शैक्षणिक वर्षात सोलापूर शहरात महानगरपालिकेच्यावतीने केल्या जाणाऱ्या शहर स्वच्छतेविषयी जाणून घेण्याचे ठरवले. हा विषय निश्चित केल्यावर शहरातील स्वच्छता व्यवस्थापन जाणून घेण्याबरोबरच स्वच्छता कामगारांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेणे व परिसर स्वच्छतेत आपला सहभाग/भूमिका कशी असावी याची जाणीव विद्यार्थ्यांना करुन देणे अशी काही उद्दिष्टे निश्चित केली.

उद्दिष्टनिश्चिती केल्यावर उपक्रमाचा ढोबळ आराखडा आखला. यात पूर्वतयारी, प्रत्यक्ष उपक्रम व उपक्रमानंतरचे नियोजन केले. या योजनेत इ.५ वी ते १० वी तील ५१५ विद्यार्थी व ६५ मार्गदर्शक यांचे जवळपास ५० गट ठरवले. प्रत्येक गटात इ.५ वी ते १० वी मधील ८-१० विद्यार्थी समाविष्ट केले.

पूर्वतयारीच्या ६५ मार्गदर्शकांत शिक्षक,कार्यालयीन कर्मचारी, माजी विद्यार्थी -विद्यार्थीनी यांचा समावेश होता.अंतर्गत सर्वात प्रथम सोलापूर म.न.पा. आयुक्तांची परवानगी घेऊन मा. आरोग्य निरीक्षकांच्या सहकार्याने शहरातील ५० प्रभागात संपर्क साधून भेटीची ठिकाणे निश्चित केली. या बरोबरच विशिष्ट दिवस व वेळही ठरवली.

**प्रत्यक्ष कृती कार्यक्रम -**

ठरलेल्या दिवशी सर्व गट सकाळी नेमून दिलेल्या प्रभागामध्ये रवाना झाले. विद्यार्थ्यांना स्वच्छता कामगार तसेच आरोग्य निरीक्षकांच्या मुलाखतीसाठी एक प्रश्नावली दिली होती. स्वच्छता कामगार व त्यांच्या कामाविषयी माहिती मिळवून देणारी ही प्रश्नावली होती. तिच्या मदतीने जवळपास ५० आरोग्य निरीक्षक व सुमारे २५० स्वच्छता कामगारांचे वैयक्तिक जीवन व त्यांचे काम याविषयी माहिती मिळाली.

मुलाखती घेऊन एका वेगळया अंतर्मुख करणाऱ्या अनुभवासोबत हे विद्यार्थी त्या कामगारांच्या परिस्थितीचा विचार मनात घोळवत परत आले आणि आल्यावर याविषयी आणखी भाष्य करणारी, पुणे शहराच्या कचरा व्यवस्थापनावर प्रकाश टाकणारी कचराकोंडी ही चित्रफित विद्यार्थ्यांना दाखवली. शहराचे कचरा व्यवस्थापन, त्यासाठी करावी लागणारी कामे व जाणवणाऱ्या अडचणी यावर ही चित्रफित आधारलेली होती. चित्रफितीत चित्रित केलेले अनुभव आणि स्वत:ला आलेले अनुभव या दोन्हीची सांगड घालता घालता स्वत:त काय बदल करु शकू याचा विचार विद्यार्थी करायला लागल्याचे त्यांच्या मनोगतांतून जाणवले.

या वर्षीचा हा वेगळा विचार करायला लावणारा उपक्रम विद्यार्थ्यांपर्यंत किती पोहोचला व त्यांना किती पटला हे समजावे आणि त्या अनुभवांचे शेअरींग व्हावे यासाठी गटचर्चा घेतली. गटचर्चेतून विद्यार्थ्यांनी स्वत:च्या आणि नागरिकांच्या वागण्याबाबत किंवा सवयींबाबत विचार केल्याचे जाणवले. आपण टाकलेला कचरा हे कामगार कसलाही विचार न करता विशेषत: स्वत:च्या आरोग्याची काळजी न करता स्वच्छ करतात हे पाहिल्यावर विद्यार्थ्यांच्या मनात त्यांच्याविषयी विशेष आदराची भावना निर्माण झाली. कचरा व्यवस्थापनाची आवश्यकता याविषयी विशेष भावना निर्माण झाली. कचरा व्यवस्थापनाची आवश्यकता याविषयी जाणीव झाल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले. तसेच स्वच्छता कामगारांनी वैयक्तिक स्वच्छतेकडे केलेले दुर्लक्ष, त्यांच्यातील व्यसनाधीनता, मुलांच्या शिक्षणाची तळमळ आणि अशिक्षित असल्याची खंत विद्यार्थ्यांना जाणवली. याबरोबरच त्यांच्या आरोग्याचा प्रश्न किती चिंतेचा आहे हे जाणवले. कामगारांना मिळणारी साधने पुरेशी वेळेत उपलब्ध होत नसल्याचे जाणवले. याबरोबरच घंटागाडी योजना चांगली व उपयोक्त असल्याचे विद्यार्थ्यांनी मांडले.

एकूणात शहर स्वच्छता प्रणालीविषयी किंवा व्यवस्थेविषयी विद्यार्थ्यांना समजलेल्या बाबी म्हणजे

१. सोलापूर शहरात जवळपास ७५० कर्मचारी सोलापूर शहरात कार्यरत आहेत.
२. कर्मचाऱ्यांच्या कामाचा अनुभव ९-१० महिन्यांपासून ते २५ वर्षांपेक्षा अधिक आहे.
३. नवीन साधनांची आवश्यकता असल्याचे आढळले.
४. कचरा विल्हेवाटीबाबत फारशा नवीन योजना येत नसाव्यात मात्र आल्यावर प्रशिक्षण दिले जाते.
५. पुरुषांपेक्षा स्त्री कामगार जास्त आहेत वेतनात परंतु त्यांना मिळणाऱ्या फारसा फरक नाही.
६. व्यसन मुक्ती अधिकाऱ्यांकडून मार्गदर्शन मिळते पण ठोस कार्यवाहीचा अभाव आहे.


७. नागरिकांचे कचरा टाकण्याच्या बाबतीत असहकार्य दिसून येते.
८. यातून विद्यार्थी काय शिकले याचा जर विचार त्यावर खालील बाबी ध्यानात आल्या.
१. शहर स्वच्छतेसाठी खूप मोठया प्रमाणावर व्यवस्था उभी करावी लागते.
२. परिसर स्वच्छतेसाठी कार्य करणारे स्वच्छता कामगार आपल्यासाठी कष्ट घेतात याची जाणीव झाली.
३. त्यांचे कष्ट कमी व्हावेत यासाठी रस्त्यावर कचरा टाकायला नको याची जाणीव झाली.
४. स्वतः अशिक्षित असूनही आपल्या मुलांना शिकविण्याची तळमळ कामगारांमध्ये दिसल्याने त्यांच्या पाल्यांच्या शिक्षणासाठी प्रयत्न करण्याची इच्छा दिसली.

या साऱ्यातून प्रत्येक विद्यार्थ्यांने या विषयीची जागरूकता स्वतःमध्ये, कुटुंबामध्ये वा परिसरामध्ये निर्माण केली तरी त्या वर्षीचा समाजदर्शन उपक्रम उद्दिष्टांपर्यंत पोहोचला असे वाटते.

सौ. माधुरी कुलकर्णी
ज्ञान प्रबोधिनी बाल विकास मंदिर, सोलापूर

**Deschooling Society**

De-schooling Society (1971) is a critical discourse on education as practiced in modern economies. It is a book that brought Ivan Illich to public attention. Full of detail on programs and concerns, the book gives examples of the ineffectual nature of institutionalized education. Illich posited self-directed education, supported by intentional social relations in fluid informal arrangements
Today, when people consider “learning”, they equate it with the school system, which provides opportunities for them to learn. Thus, anything learned outside of school is ignored by society. Possessing good education means receiving a degree from school and therefore, the system of school monopolizes education as the only place of official learning and abolishes other learning. According to Illich, educational background shows only the process, what you are taught but not the quality of what you actually learn. Originally, schools were established to give people equal opportunities, however, they now create levels among people.




www.arvindguptatoys.com/arvindgupta/DESCHOOLING.pdf

## Magazines for teachers

Prashikshak: www.erc-pune.org

www.teacherplus.org

www.educationworldonline.net

www.newscientist.com

www.efprofessional.com

www.modernenglishteachers.com


॥ राष्ट्रदेवाः भवेम ॥

# ज्ञान प्रबोधिनी शैक्षणिक साधन केंद्र

पत्ता : 'विनायक भवन', ५१४ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०.
✆ २४२०७१९३, २४२०७१९४
E-mail: erc@jnanaprabodhini.org


**Visit us at: www.erc-pune.org**